## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ३०४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १५/०६/२०१८

**१) संगनमत करुन रेती घाट बंद का केला कारणावरुन शिवीगाळ करुन टेकलेल्या दाराला लाथाने मारल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक १३/०६/२०१८ चे २२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी सौ. मंगला अंबादास गायमुखे वय ४५ वर्ष, रा. जुनोना याचा मुलगा जुनोना गावाचे सरपंच पदावर असुन त्यानी अवैधरित्या रेती वाहतुक करणाऱ्या वाहनावर कार्यवाही केली म्हणुन घटनेवेळी फिर्यादी ह आपले मुलासह घरी हजर असतांना यातील आरोपीतांनी फिर्यादीचे मुलाला रेती घाट बंद का केला या कारणावरुन फिर्यादीचे घरासमोर येवुन फिर्यादीला शिवीगाळ करुन तुझा मुलगा केव्हाचा सरपंच बनला? असे बोलुन फिर्यादीचे टेकलेल्या दाराला लाथाने मारल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४५२,५०४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**२) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक १४/०६/२०१८ चे १४.०० ते १५.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे आपले ग्राम पंचायत कार्यालय शासकीय काम करीत असतांना आरोपी हा ग्राम पंचायत कार्यालयात जावुन फिर्यादीचे टेबलवर असलेले काच हाताने फोडले तसेच प्लॉटीक खुर्च्याची तोडफोड केली व पटांगनात फेकुन दिले तसेच तलाठी कार्यालयात जावुन तलाठी संजीत सवालाखे यांना सुदधा शासकीय कामात अडथळा निर्माण केला तसेच सदर आरोपीने १५.२० वा पुन्हा ग्राम पंचायत कार्यालयात येथे जावुन तेथील उपस्थित महीला सरंपच व सदस्य यांना अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्यावरुन नमुद प्रमाणे तक्रार यांनी आपआपले लेखी तक्रार दिल्याने सदर गुन्हा नोंद अतर २ तक्रारदार यांची लेखी तक्रार कागदपत्रात समाविष्ट करुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ५०९,१८६,४२७,३५३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चाबुकस्वार पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**३) टॅंकर निष्काळजीपने चालवुन स्वत: व क्लिनर चाकास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक १३/०६/२०१८ चे २२.०० वाजता दरम्यान यातील आरोपी टॅकर चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन क्लिनर सुशिल प्रभु फुलझेडे वय ३९ वर्ष, रा. चंद्रा नगर नागपुर याला व स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने सरतर्फे फिर्यादी मपोउपनि. फटींग यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १८४,१८५ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गोंडाणे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) विना परवानगीने उपोषनाला बसुन नारेबाजी केल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक ०८/०६/२०१८ चे १७.३० वाजता दरम्यान यातील प्रहार शिक्षक संघटनेच्या शिक्षकांनी त्यांचे बदलीचे संदर्भाने कुठलीही परवानगी न घेता जिल्हा परिषद समोर धरणे धरुन उपोषणास बसले त्यांना मुख्यकार्यकारी अधिकारी जि. प. भंडारा यांनी पत्र देवुनही त्यांचे आदेशाचे उल्लंघन करुन प्रशासकीय इमारतीचे छतावर जावुन शासनाविरुध्द नारेबाजी केली तसेच विना परवानगीने मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. भंडारा यांचे दालनात जावुन बसुन राहील्याने फिर्यादी दिनेश मानिकराम बोरकर वय ४३ वर्ष, रा. म्हाडा कॉलोनी भंडारा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४४७,१८६,१८८,१८९ भादंवि. सहकलम १३५,१२० मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. बोकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) विवाहीतेला शारिरीक व मानसिक त्रास दिल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक ३१/०६/१९९४ ते आज पर्यन्त यातील फिर्यादी हीला आरोपी पासुन मुलगी ही झाल्यापासुन आरोपीतांनी शारिरीक व मानसिक छळवणुक केली त्यांचे प्रकरण महिला सहायता कक्ष भंडारा येथे चालु होते परंतु त्यांच्या मध्ये समझोता न झाल्याने व तसा अहवाल महिला सहायता कक्ष भंडारा यांचे कडुन पत्र प्राप्त झाल्याने व फिर्यादीची तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४९८(अ), ३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. ऊईके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**६) संगनमत करुन घरगुती कारणावरुन डावे हाताचे भुजेवर तोंडाने चावा घेतल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक १४/०६/२०१८ चे ०९.३० वाजता दरम्यान यातील आरोपी जावुन घरगुती कारणाचे टोमणे मारले असुन फिर्यादीने तिला हटकले असता यातील आरोपी हीने फिर्यादीचे डावे हाताचे भुजेवर तोंडाने चावा घेतल्याने फिर्यादी सौ. पायल चेतन गायधने वय २५ वर्ष, रा. न्यु देव नगर खात रोड भंडारा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. ऊईके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

७) ट्रक लापरवाहीने चालवुन मोटार सायकलला व वाल कॅम्पाउडला धडक देवुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक १३/०६/२०१८ चे १७.०० वाजता दरम्यान यातील आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने, लापरवाहीने चालवुन आपली साईड सोडुन फिर्यादीचे अंगनात ठेवलेली मोटार सायकल क्र. एमएच ३६ यु ३१६९ तसेच राजेश ढबाले यांची नविन मोटार सायकल विना क्रमांकाची ला खरबी येथे धडक मारुन वाल कॅम्पाउडला धडक देवुन एकुण ८०,०००/—रु. ची नुकसान करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी राधेश्याम इसन गभणे वय ४९ वर्ष, रा. खरबी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २७९ भादंवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. तिवाडे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

८) आयटेन गाडी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपने चालवुन एकाचा मृत्यु :—

दिनांक ३१/०५/२०१८ चे १०.१२ वाजता दरम्यान यातील मृतक श्रीचंद रामजी नागरीकर वय ५३ वर्ष, रा. साकरीटोला हा त्याचें वॅगनार गाडी क्र. एमएच ३१ सीएम १९२९ ने साकरीटोला येथुन लाखनी येथे एनएच—६ रोडने जात असतांना तेली नाला जंगलात समोरुन येणारी आयटेन गाडीचे आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन एनएच ०६ रोड मोहघाटा जंगल येथे धडक मारुन अपघात केल्याने मृतक हा जखमी होवुन उपचारा दरम्यान सुवरटेक हॉस्पीटल नागपुर येथे दिनांक ०८/०६/२०१८ ला मरण पावल्याने पोस्टे धंतोली नागपुर येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र आज रोजी टपालाव्द्वारे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. गिन्हेपुंजे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३०४(अ) भादंवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. निंबेकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत

९) संगनमत करुन महिलेस मानसिक व शारिरीक छळ करुन संशयास्पद मृत्यु घडवुण आनल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक १०/०६/२०१८ चे ००.३० वाजता दरम्यान यातील मृतक पुष्पा रामदास चव्हाण ची सवत सुनिता व पती रामदास चव्हाण यांनी दिनांक ०७/०६/२०१८ ते १०/०६/२०१८ चे ००.३० वा पावेतो पुष्पाची मानसिक व शारिरीक छळवणुक करुन संशयास्पद मृत्यु घडवुन आणला मृतक हीचे मृत्यु संबधाने मर्ग क्र. ०९/१८ कलम १७४ जाफौ. अन्वये तपासावरुन व फिर्यादी लहानु धर्माजी शिंदे वय ४६ वर्ष, रा. केडापुर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३०४(ब),४९८(अ), ३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. पुसाटे पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत आरोपी अटक आहे. .

१०) अवैध हातभट्टी व देशी दारु / जुगार अडड्यांवर धाडी . :—

दिनांक १४/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, वरठी, तुमसर, पवनी, लाखांदुर व भंडारा येथे हातभट्टी व देशी दारु/जुगार अड्डयावर धाडी घालुन ०८ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २७ लिटर हातभट्टी दारु किंमती २४२०/—रु. १८१ लिटर ४४० मिली लिटर देशी दारु + १ स्कॉर्पिओ गाडी किंमती ५,५२,४१६ /—रु. तसेच जुगारातुन किंमती ३२०/—रु. असा एकुण ५,५५,१५६/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.